2 9 DEC 2025
पुढारी

# विद्यापीठात उद्यापासून संत साहित्य संमेलन

**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, भाषाविकास संशोधन संस्था आणि संत तुकाराम अध्यासन, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३० रोजी राजर्षी शाहू सिनेट सभागृह येथे संत साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाचा प्रारंभ सकाळी ९ वाजता ग्रंथदिंडीने होणार आहे. ग्रंथदिंडीचे पालखी पूजन शिवाजी विद्यापीठाच्या प्रभारी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते होईल. सकाळी ११ वाजता संत साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. सदानंद मोरे यांच्या उद्घाटन हस्ते उद्घाटन होणार आहे. संमेलनाध्यक्ष संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. सतीश बडवे असणार आहेत. उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी असणार आहेत.

29 DEC 2025

पुढारी



कोल्हापूर : डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने आयोजित कॅमेरा तंत्र कार्यशाळेत विद्यार्थ्यांना कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देताना सुधीर बोरनाक. (छाया : पप्पू अत्तार)

# सोशल मीडियाच्या काळातही कॅमेरा तंत्र आवश्यक : बोरनाक

## विद्यापीठात डॉ. ग. गो. जाधव अध्यासनातर्फे कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सोशल मीडियाच्या काळात कॅमेऱ्याचे महत्त्व नव्याने अधोरेखित होत आहे. त्यामुळे कॅमेरा तंत्रात नव्याने झालेले बदल शिकून घेणे आवश्यक असल्याचे मत कॅमेरा प्रशिक्षक सुधीर बोरनाक यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठात पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने आयोजित फोटोग्राफी कार्यशाळेत ते बोलत होते. याप्रसंगी बोरनाक यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून कॅमेऱ्याच्या विविध फीचर्सची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. विद्यार्थ्यांनी यावेळी बोरनाक यांच्याकडून हँडस् ऑन ट्रेनिंग घेतले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी स्वागत केले. जयप्रकाश पाटील यांनी आभार मानले.

यावेळी बी. ए. फिल्म मेकिंगचे शिक्षक अनुप जत्राटकर यांच्यासह ऑनलाईन जर्नालिझम, फोटोग्राफी, शॉर्ट फिल्म मेकिंग, एम. ए. मास कम्युनिकेशन, बी.ए. फिल्म मेकिंग विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.

2 9 DEC 2025

लोकमत

# सोशल मीडियावरील माहितीवर विश्वास ठेवताना सावध राहा

## शिवाजी जाधव : मीडिया लेखन कार्यशाळेचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : सोशल मीडियावर वेगाने पसरवली जाणारी माहिती अनेकदा अपुरी किंवा दिशाभूल करणारी असू शकते. त्यामुळे कोणतीही बातमी स्वीकारण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे आवश्यक आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी जाधव यांनी शुक्रवारी (दि. २६) व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागात आयोजित सातदिवसीय मीडिया लेखन कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी होत्या. डॉ. जाधव म्हणाले, माध्यमातील मजकुराकडे नागरिकांनी चिकित्सक दृष्टीने पाहण्याची गरज आहे. डिजिटल माध्यमांमुळे माहितीचा प्रचंड प्रसार झाला असून, त्यातून माहितीचे प्रदूषण वाढत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. अशा काळात पत्रकारांनी सामाजिक बांधिलकी जपत जबाबदारीने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. करेकट्टी यांनी या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये मीडिया लेखनाबाबत नवी दृष्टी आणि आत्मविश्वास निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला. विद्यार्थी प्रतिनिधी संदीप बरगे आणि स्वप्नाली धुलुगडे यांनी अनुभव मांडले. डॉ. जयसिंग कांबळे यांनी आयोजन केले. अविनाश कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. श्रीकांत देसाई यांनी आभार मानले.

29 DEC 2025 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेलो इंडियासाठी जलतरणपटूंची निवड

## शिवाजी विद्यापीठाच्या तीन मुली व दोन मुलांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या जलतरणपटूंची खेलो इंडिया स्पर्धेसाठी मुलींत धिरिजा रमेश मोरे, अनुष्का सयाजी पाटील, कृष्णा शेळके आणि मुलांत धैर्यशील किरण भोसले, चिन्मय सूर्यवंशी यांची निवड झाली.

चेन्नई येथे झालेल्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी आयोजित जलतरण स्पर्धेत देशातील १६१ विद्यापीठातून ७५० स्पर्धक सहभागी झाले. खेळाडूंना कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्यासह विद्यापीठ क्रीडा विभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, संघ व्यवस्थापक डॉ. प्रा. सुनील खराडे, प्रशिक्षक डॉ. महेश पाटील, सुजय खोपडे, डॉ. राजेंद्र रायकर, सागर पाटील जलतरण तलावाचे प्रशिक्षक मानसिंग पाटील, जिल्हा क्रीडा संकुलाचे प्रशिक्षक प्रभाकर डांगे यांचे मार्गदर्शन लाभले.




शिवाजी विद्यापीठाच्या जलतरणपटूंची खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड झाली. त्यात धिरिजा मोरे, अनुष्का पाटील, कृष्णा शेळके, धैर्यशील भोसले, चिन्मय सूर्यवंशी.

29 DEC 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जलतरण स्पर्धेत विद्यापीठाची दमदार कामगिरी

## पुढील वर्षी होणाऱ्या खेलो इंडिया गेम्ससाठी संघाची निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेत प्रतिनिधित्व केलेल्या शिवाजी विद्यापीठ संघातील जलतरणपटूंनी जोमदार कामगिरी बजावली आहे. सलग पाच दिवस सुरु राहिलेल्या या जलतरण स्पर्धेत भारतातील १६९ विद्यापीठ संघांमधून ७५० महिला व पुरुष जलतरणपटूंनी सहभाग घेतला होता.




कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेत जोमदार कामगिरी करुन शिवाजी विद्यापीठाचे नाव रोशन केलेल्या महिला व पुरुष जलतरणपटूंसोबत संघ व्यवस्थापक प्रा. डॉ. सुनिल खराडे व प्रशिक्षक प्रा. डॉ महेश पाटील.

शिवाजी विद्यापीठीच्या संघातून राष्ट्रीय पातळीवर मोठी कामगिरी बजावलेल्या धिरिजा रमेश मोरेने स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले. तिने २०० मीटर बॅकस्ट्रोक, २०० मीटर फ्रीस्टाईल या दोन्ही प्रकारात आठवा क्रमांक मिळवला. तसेच मिक्स गटातून ४ बाय १०० मीटर फ्रीस्टाईल रिले, ४ बाय १०० मीटर मिडले या दोन्ही प्रकारात प्रतिनिधित्व केलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या संघानेही आठवा क्रमांक मिळवला. या संघात धिरिजासह अनुष्का पाटील, चिन्मय सूर्यवंशी आणि धैर्यशील भोसले यांचा होता.

अनुष्का सयाजी पाटीलनेही वेगवान कामगिरी करत १०० व २०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात आठवा क्रमांक प्राप्त केला. तसेच कृष्णा शेळकेने १०० मीटर फ्रीस्टाईल या प्रकारात, धिरिजा मोरेने १०० मीटर बॅकस्ट्रोक, चिन्मय सूर्यवंशीने १०० मीटर बटरफ्लाय प्रकारात आणि धैर्यशील भोसलेने १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक प्रकारात उत्कृष्ट कामगिरी बजावली. स्पर्धेतील वरील सर्व जलतरणपटूंच्या कामगिरीची दखल घेऊन त्यांची २०२६ या नवीन वर्षात आयोजित केल्या जाणाऱ्या खेलो इंडिया गेम्समधील जलतरण स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या तया सर्व जलतरणपटूंना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरु डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विद्यापीठ क्रीडा विभाग प्रमुख डॉ. शरद बनसोडे, संघ व्यवस्थापक प्रा. डॉ. सुनिल खराडे व शिवाजी विद्यापीठाचे प्रशिक्षक प्रा. डॉ. महेश पाटील, सुचय खोपडे व डॉ. राजेंद्र रायकर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.